नाशिक महानगरपालिका सेवेतील
अधिकारी/कर्मचाऱ्यांची ०१ जानेवारी, २०१७,
०१ जानेवारी,२०१८,०१ जानेवारी,२०१९ व ०१
जानेवारी, २०२० रोजीची स्थिती दर्शविणारी
सेवाजेष्ठता यादी प्रसिध्दी बाबत.

**परिपत्रक**

नाशिक महानगरपालिका,नाशिक
जा.क्र.आस्था/वशि/७९३/२०२० दिनांक२४/०३/२०२०

**वाचा** :- १) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन),नियम १९८२.
२) सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२, व सामान्य प्रशासन,शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२.दिनांक २१/१०/२०११ मधील तरतूदीनुसार नाशिक महानगरपालिका सेवेतील तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी यांची व लेखा / लेखापरिक्षण संवर्गातील ०१ जानेवारी,२०१३, ०१ जानेवारी,२०१४, ०१ जानेवारी,२०१५, ०१ जानेवारी, २०१६, ०१ जानेवारी, २०१७, ०१ जानेवारी,२०१८, ०१ जानेवारी,२०१९ व ०१ जानेवारी,२०२० व उर्वरीत संवर्गाची ०१ जानेवारी, २०१७, ०१ जानेवारी,२०१८,०१ जानेवारी,२०१९ व ०१ जानेवारी, २०२० रोजीची स्थिती दर्शविणाऱ्या संवर्गनिहाय स्वतंत्र प्रारुप सेवाजेष्ठता याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या याद्या नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळ www.nmc.gov.in यावर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

ज्या अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे जेष्ठतेबाबत किंवा इतर कर्मचाऱ्यांचे जेष्ठतेबाबत काही हरकत असल्यास,त्याचप्रमाणे सेवाजेष्ठता यादीतील नमूद शैक्षणिक अर्हता,जातीचा प्रवर्ग,जन्म तारीख, सेवानिवृत्तीचा दिनांक इत्यादीबाबत काही हरकती/सुचना असल्यास नाशिक महानगरपालिकेच्या dmc_gad@nmc.gov.in या ई-मेल आयडी वर लेखी हरकत स्वाक्षरीनिशी कागदपत्रांसह (Scan pdf) दिनांक २६/०३/२०२० पासून १५ दिवसांचे आंत पाठविण्यात यावी. सद्यस्थितीत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने हरकत दाराने समक्ष कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. मुदतीनंतर आलेल्या हरकती/सुचना किंवा आक्षेपांवर विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२४।३.
आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

**प्रत :**

**१) सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख/सर्व विभागीय अधिकारी**
सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन पोहोच स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी.

**२) संगणक विभागप्रमुख** –सदरच्या सेवाजेष्ठता याद्या सॉफट कॉपी मध्ये सहपत्रीत करण्यात येत असून सदर प्रारुप सेवाजेष्ठता याद्या नाशिक महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात.

Scanned by CamScanner